# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/E/०००८४**

**अपिलार्थी श्री. पंचप्पा काळे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
पोलीस मुख्यालय, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई -४०० ००१.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
पोलीस मुख्यालय, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई -४०० ००१

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०१.०७.२०२५</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रकिंग रिपोर्ट नुसार दि. १८.०६.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १५.१२.२०२३ | १९.१२.२०२३ | १६.०१.२०२४ | |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०८.०४.२०२४ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश मिळाले नाहीत असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १९.१२.२०२३ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. १५.१२.२०२३ रोजी पोलीस आयुक्त, मुंबई यांच्याकडे माहिती अर्ज सादर करुन पोलीस महासंचालक यांना उद्देशून दि. १६.१०.२०२३ व दि. १५.१२.२०२३ रोजी करण्यात आलेली तक्रारीवर केलेली कार्यवाहीची माहिती विचारली होती. पोलीस आयुक्त, मुंबई यांनी माहितीचा अर्ज पोलीस महासंचालक, कार्यालयाकडे दि. १९.१२.२०२३ रोजी ऑनलाईन हस्तांतरीत केला. अपिलार्थी यांनी दि.१६.०१.२०२४ रोजी पोलीस आयुक्त, मुंबई यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी सुनावणी नोटीस प्राप्त असूनही अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, पोलीस महासंचालक कार्यालय व जन माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय उपस्थित असून जन माहिती अधिकारी, पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांनी आयोगास सादर केले की, सहायक पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी श्री. पंचप्पा काळे यांचा दि. १५.१२.२०२३ रोजीचा अर्ज या

..२/-

कार्यालयात पाठविण्यात येत असलेबाबत संदर्भाधिन दि. १८.१२.२०२३ च्या अन्वये या कार्यालयास दि.२१.१२.२०२३ रोजी ई-ऑफिस द्वारे कळविले होते. सदरहू पत्राचे अवलोकन केले असता, अर्जदार पंचप्पा काळे यांचा माहिती अधिकार अंतर्गत दि. १५.१२.२०२३ रोजीचा अर्ज पत्रासोबत प्राप्त झाला नसल्याने दि. १८.१२.२०२३ रोजीचे पत्र दि. २२.१२.२०२३ रोजी पोलीस आयुक्त कार्यालयास परत करण्यात आलेले आहे. त्यामुळे, अर्जदार यांचा दि. १५.१२.२०२३ रोजीचा अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेला नाही.

सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी, मुंबई पोलीस आयुक्त कार्यालय यांनी माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी, पोलीस महासंचालक कार्यालय यांना उपलब्ध करुन दिला.

जन माहिती अधिकारी, पोलीस महासंचालक कार्यालय यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थींना आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत टपालाने कळवावे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०२.०७.२०२५**

State Information Commission Greater Mumbai